**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्यासमवेत आज मेलबर्न क्रिकेट मैदानाला भेट

- ऑस्ट्रेलियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री न्यूझीलंडला रवाना

- राममंदिर ट्रस्ट प्रकरणाची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकेवर येत्या सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**आणि**

- ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर आज महिला क्रिकेटचा पहिला कसोटी सामना भारत आणि इंग्लंड दरम्यान रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्यासमवेत आज मेलबर्न क्रिकेट मैदानाला भेट दिली. भारतात तंत्रज्ञानाप्रमाणे खेळांचंही लोकशाहीकरण होत असल्याचं सांगून त्यांनी सांगितलं, "खेलो इंडिया'मुळे ग्रामीण भागातल्या सामान्य कुटुंबांतल्या मुलांना मोठी स्वप्न पाहण्याचं व्यासपीठ मिळालं आहे. २०३० मधे राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा भारतात होणार असून, २०३६ च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचं यजमानपद मिळवण्याचा भारताचा प्रयत्न आहे, असं ते म्हणाले. मोदी यांनी यावेळी ऑस्ट्रेलियातले तरुण खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधला. ऑस्ट्रेलियात आयोजित होणाऱ्या 'बिग बॅश लीग' क्रिकेट स्पर्धांचा एक हंगाम भारतात आयोजित केला जाईल, अशी घोषणा ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अल्बानीज यांनी यावेळी केली. सीमा आणि संस्कृतींच्या पलीकडे जाऊन खेळ मैत्री दृढ करतो, असं ते म्हणाले. 'बिग बॅश लीग'च्या चेन्नईतल्या आयोजनावर मोदी यांनी आनंद व्यक्त केला.

**- - - होल्ड- बाईट - प्रधानमंत्री १ - --**

तीन दिवसांच्या दौऱ्यात महत्त्वपूर्ण चर्चा आणि भेटीगाठी आटोपून प्रधानमंत्री मोदी न्यूझीलंडसाठी रवाना झाले. ऑस्ट्रेलियातले विरोधी पक्ष नेते अंगस टेलर यांचीही भेट

प्रधानमंत्री मोदी यांनी आज घेतली. संरक्षण, व्यापार, शिक्षण गुंतवणूक, हिंद प्रशांत महासागर क्षेत्रातलं नौवहन अशा विविध विषयांवर त्यांची चर्चा झाली. ऑस्ट्रेलियाबरोबरचे संबंध भारताच्या दृष्टीनं महत्त्वाचे असल्याचं मोदी म्हणाले.

**- - - होल्ड - बाईट- प्रधानमंत्री २ - - -**

न्यूझीलंडमधे प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी विशेषतः भारतीय समुदाय उत्साहात आहे. न्यूझीलंडचं स्थानिक माओरी नव-वर्षही आज सुरु होत असून त्याचाही उत्साह पहायला मिळत आहे.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यानच्या क्रीडा संबंधांना यावर्षी १०० वर्ष पूर्ण होत आहेत.

भारतीय सेनेच्या हॉकी संघाने १९२६ मध्ये प्रथम न्यूझीलंडचा दौरा केला होता. या संघात भारतीय हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचाही समावेश होता. याच दौऱ्यापासून मेजर ध्यानचंद यांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील कारकिर्दीला सुरुवात झाली.

दरम्यान, याचवर्षी ऑकलंड इथं झालेल्या FIH महिला नेशन्स हॉकी चषक स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघानं न्यूझीलंडला पराभूत करत जेतेपद मिळवलं आहे. दोन्ही देशांमधील क्रीडा संबंधांना शतक पूर्ण होत असून त्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या न्यूझीलंड दौऱ्याला विशेष महत्त्व आहे.

**<><><><><>**

निती आयोगाचे सदस्य डॉ. जोराम अनिया यांनी नवी दिल्लीत युनिसेफच्या भारतातील प्रतिनिधी सिंथीया मॅक-कॅफ्रे आणि शिष्टमंडळाबरोबर बैठक घेतली.

या बैठकीत सुरक्षित आणि सर्वसमावेशक शिक्षण, साक्षरता आणि संख्याज्ञान, शिक्षक प्रशिक्षण, सायबर सुरक्षा आणि डिजिटल सुरक्षितता या मुद्द्यांवर तसंच आकांक्षित जिल्हे आणि आकांक्षित ब्लॉक उपक्रमांवर भर देण्यात आल्याची माहिती निती आयोगानं दिली. यावेळी डॉ. अनिया यांनी पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती, लोकसहभाग, आपत्ती प्रतिकारक्षमता तसंच बालकल्याण आणि शिक्षणाची परिणामकारकता वाढविण्यासाठी महिला बचत गटांची भूमिका महत्त्वाची असल्याचं अधोरेखित केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात जिल्हा परिषदेच्या शाळांमधल्या शिक्षकांची बदली प्रक्रिया शाळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण व्हावी, या दृष्टीने शासन नियमावली तयार करेल, असं आश्वासन मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत एका लक्षवेधी सुचनेच्या उत्तरात दिलं. महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये आता प्राथमिक स्तरावरील पेट स्कॅनचा समावेश देखील करण्यात येणार असून कॅन्सर संदर्भातील उपचार करण्यासाठी अधिकची रक्कम या योजनेमध्ये दिली जाईल अशी माहिती आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

**<><><><><>**

जल जीवन मिशनच्या अंतर्गत विविध कामांचे १८ हजार सुधारित प्रस्ताव सरकारला प्राप्त झाले आहेत. त्यांना लवकरात लवकर मंजुरी देऊ आणि आवश्यक निधी देऊ असं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विधान परिषदेत सांगितले. अनेक गावामध्ये पाहणी करताना काही वाड्या वस्त्यांना वगळण्यात आल्याने हे सुधारित प्रस्ताव मागवले होते. यापूर्वी ११ हजार प्रस्ताव मंजूर झाले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

गेल्या वर्षी ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील चौदशेहून अधिक पाझर तलाव आणि कोल्हापुरी बंधाऱ्यांचं नुकसान झालं. त्यातल्या ४५२ कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे, अशी माहिती मंत्री दादाजी भुसे यांनी विधान परिषदेत दिली. ४५२ पैकी २५८ कामं पूर्ण झाली असून १०९ कामं सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

अयोध्येतल्या श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासातल्या देणगी अपहाराच्या चौकशीची मागणी करणाऱ्या याचिका समुहावर सर्वोच्च न्यायालयात येत्या सोमवारी सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखाली न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठासमोर ही सुनावणी होईल. अयोध्येतल्या राम मंदिरासाठी दिलेल्या दान आणि देणग्यांच्या अपहाराच्या आरोपाची आणि इतर अनियमिततांची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करावी अशी मागणी या याचिकेमध्ये केली आहे.

सध्या या प्रकाराची चौकशी उत्तरप्रदेश राज्यसरकारने नेमलेल्या विशेष तपास पथकामार्फत होत आहे.

**<><><><><>**

देशात विजेच्या एकूण मागणीपैकी ५० टक्क्यांहून अधिक मागणी स्वच्छ ऊर्जेद्वारे पूर्ण झाली असून हे दुसऱ्यांदा घडत असल्याचं नवीन आणि नवीकरणीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितलं. ६ जुलै रोजी एकूण वीज पुरवठ्यामध्ये नवीकरणीय स्त्रोतांचा वाटा ५० पूर्णांक २ दशांश टक्के इतका होता, असं जोशी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

अमरनाथ यात्रेसाठी ८ हजार ७९६ भाविकांची नववी तुकडी आज भगवती नगर बेस कॅम्पवरून कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत रवाना झाली. आज पहाटे ३ हजार ४५० भाविकांना घेऊन जाणारा एक ताफा बालताल मार्गे तर उर्वरित ५ हजार ३४६ भाविकांचा ताफा पहलगाम मार्गे रवाना झाला. २ जुलै रोजी सुरू झालेल्या या यात्रेत आतापर्यंत १ लाख ७३ हजारांपेक्षा जास्त भाविकांनी सहभाग घेतला आहे.

दरम्यान, उधमपूर जिल्ह्यात अमरनाथ यात्रेकरूंना घेऊन जाणारी एक गाडी जम्मू-श्रीनगर महामार्गावर उलटून अपघात झाला. या अपघातात सहा भाविक जखमी झाले आहेत.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंडदरम्यानच्या एकमेव कसोटी सामन्याला आजपासून लॉर्ड्स मैदानावर सुरुवात होत आहे. दुपारी साडे तीन वाजता सामन्याला सुरुवात होईल. ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर प्रथमच महिलांचा क्रिकेट सामना होत आहे.

<><><><><>

जपानमध्ये होणाऱ्या २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी २० सदस्यांच्या भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा करण्यात आली. कर्णधार पदाची धुरा पुन्हा एकदा सलीमा टेटे हिच्याकडे दिल्याचं संघाचे मुख्य प्रशिक्षक सजॉर्ड मारिनज यांनी सांगितलं. ही स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधी जपानच्या ऐची आणि नागोया या शहरांमध्ये होणार आहेत.

<><><><><>

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या काल झालेल्या पहिल्या उपांत्यपूर्व सामन्यात फ्रान्स ने मोरोक्को संघाचा 2-0 असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीच्या दुसऱ्या सामन्यात स्पेन आणि बेल्जियम, तिसऱ्या सामन्यात नॉर्वे विरुद्ध इंग्लंड आणि चौथ्या सामन्यात अर्जेंटीना विरुद्ध स्वित्झर्लंड अशा लढती होणार आहेत.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस राजस्थान, हरयाणा आणि पंजाबच्या उर्वरित भागातून पुढे सरकला असून, आता त्याने संपूर्ण देश व्यापला आहे.

उत्तराखंडमधे आज अतिवृष्टीची शक्यता हवामान विभागाने वर्तवली असून, 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. देशाच्या उर्वरित राज्यांत मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

//<><><><><>//